ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक -
माहे जानेवारी २०२१ ते मे २०२२ या कालावधीत मुदत संपलेल्या व जून २०२२ ते सप्टेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या ( सदस्य पदासह थेट सरपंच पदाच्या ) सार्वत्रिक निवडणूकांसाठी संगणकप्रणालीव्दारे राबविण्याचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम..

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक प्राथम्य**
**ई-मेलद्वारे**

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.४/का-८,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०७/०९/२०२२

**प्रति,**
**जिल्हाधिकारी**
ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग,
नाशिक,नंदुरबार, पुणे, सातारा, कोल्हापूर,
अमरावती, वाशिम, नागपूर, वर्धा, चंद्रपूर,
भंडारा, गोंदीया, व गडचिरोली

**विषय :- ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम २०२२**
माहे जानेवारी २०२१ - मे २०२२ या कालावधीत मुदत संपलेल्या व जून २०२२ ते सप्टेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या (सदस्य पदासह थेट सरपंच पदाच्या) सार्वत्रिक निवडणूकांसाठी **संगणकप्रणालीव्दारे** राबविण्याचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम..

**संदर्भ** -१. राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकांचे दि. २४/११/२०२१, दि.२६/११/२०२१, दि. २९/१२/२०२१, दि. २७/०१/२०२२, दि.०६/०५/२०२२, दि. ३०/०५/२०२२ दि. ०३/०६/२०२२ व दिनांक २२/०७/२०२२ चे प्रभाग रचना व आरक्षण सोडत कार्यक्रमाचे आदेश
२. राज्य निवडणूका आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ०२/०६/२०२२ चे मतदार यादी कार्यक्रमाचे आदेश

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण ,संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

ii ) **मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ व संलग्न याचिकांमध्ये दिनांक ०४/०५/२०२२ रोजीच्या अंतरिम आदेशामध्ये दिनांक १०/०३/२०२२ रोजीच्या टप्प्यापासून पुढील प्रक्रिया करण्याचे आदेश दिले आहेत.**

iii) आयोगाने दिनांक ०३/०६/२०२२ रोजी दिलेल्या आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमानुसार **माहे जानेवारी २०२१ ते एप्रिल २०२२ मध्ये मुदत संपलेल्या, माहे मे २०२२ ते डिसेंबर २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या, नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायती तसेच मागील निवडणूकीत संपूर्ण निवडणूक कार्यक्रम रद्द केलेल्या ग्रामपंचायती अशा** एकुण ९७०२ ग्रामपंचायतींची आरक्षणासह अंतिम प्रभाग रचना दिनांक २१/०६/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

iv) महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३/२०२१, दि. २३/०९/२०२१ चे सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१९, दिनांक ०१/०२/२०२२ अन्वये अधिनियमात रुपांतर करण्यात आले आहे.

v) मा. सर्वोच्च न्यायालयामधील विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ मध्ये दि. १२ जुलै, २०२२ रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे प्रमाण निश्चित करण्याकरिता गठीत केलेल्या समर्पित मागासवर्ग आयोगाने आवश्यक त्या बाबींची पूर्तता करुन दि. ७ जुलै, २०२२ रोजी आपला अहवाल शासनास सादर केल्याची बाब शासनाने अर्ज क्र. ९२६९५/२०२२ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २० जुलै, २०२२ रोजीच्या सुनावणीत राज्य निवडणूक आयोगाने यापुढील निवडणुकांमध्ये समर्पित मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन पुढील निवडणुका घेण्याबाबत आदेश दिले आहेत.

vi) दरम्यानच्या काळात दिनांक ३१/०५/२०२२ हा मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक अधिसूचित करुन आयोगाने दिनांक ०२/०६/२०२२ रोजी दिलेल्या मतदार यादी कार्यक्रमानुसार माहे जानेवारी २०२१ ते माहे सप्टेंबर २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या २०५३ ग्रामपंचायतींची अंतिम मतदार यादी दिनांक २२/०६/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. आयोगाच्या दिनांक २८/०६/२०२२ च्या निवडणूक कार्यक्रमानुसार दिनांक २२/०६/२०२२ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द केलेल्या २०५३ ग्रामपंचायतीपैकी १५ जिल्हयातील २७१ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांची प्रक्रिया पूर्ण दिनांक ०५/०८/२०२२ रोजी पूर्ण झाली आहे.

vii) मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २० जुलै, २०२२ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवण्याच्या अनुषंगाने उक्त २७१ ग्रामपंचायती वगळून उर्वरित ९४३१ ग्रामपंचायतींमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची सोडत काढण्यासाठी दिनांक २२/०७/२०२२ रोजी कार्यक्रम देण्यात आला होता. या कार्यक्रमानुसार समर्पित मागासवर्ग आयोगाने शिफारस केलेल्या टक्केवारीच्या प्रमाणात ना.मा.प्र. च्या जागा देय होतील असे कळविण्यात आले होते. त्यामुळे ज्या ग्रामपंचायतींमध्ये ना.मा.प्र.च्या जागा देय होतील अशा ग्रामपंचायतींमध्ये दिनांक १७/०८/२०२२ रोजी ना.मा.प्र.च्या आरक्षणासह अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

viii) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या आरक्षणासह अंतिम प्रभाग रचना पूर्ण झालेल्या उर्वरित १७८२ ग्रामपंचायतींपैकी ५९९ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी दिनांक १२/०८/२०२२ रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून, या कार्यक्रमानुसार दिनांक १८/०९/२०२२ रोजी मतदान होणार आहे.

viii) **मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ व संलग्न याचिकांमध्ये दिनांक १७/०५/२०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार आयोगाने जे जिल्हे/क्षेत्र पावसामुळे (monsoon) प्रभावित होणार नाहीत त्या ठिकाणी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम राबवावा व आवश्यक असल्यास परिस्थितीनुरुप त्यात बदल करावेत असे आदेशित केलेले आहे.**

ix) अंतिम मतदार यादी प्रसिध्द झालेल्या २०५३ ग्रामपंचायतींपैकी निवडणूक प्रक्रिया पूर्ण झालेल्या २७१ ग्रामपंचायती, निवडणूक कार्यक्रम सुरु असलेल्या ५९९ ग्रामपंचायती व समर्पित आयोगाच्या अहवालात दिसत नसलेल्या १७ ग्रामपंचायती वगळून १८ जिल्हयातील ८२ तालुक्यातील उर्वरित ११६६ ग्रामपंचायतींसाठी सार्वत्रिक निवडणुका घेणे क्रमप्राप्त आहे.

x) शासनाने सन २०२२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.५ अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमामध्ये सुधारणा केली असून सरपंचाची निवड थेट जनतेतून करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र.७१ , दिनांक ५ मार्च २०२० अन्वये पुढील पाच वर्षाकरीता ग्रामपंचायतींचे सरपंचाचे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. तसेच ग्राम विकास विभागाने दिनांक २१ सप्टेंबर २०१७ च्या पत्रान्वये नवनिर्मित ग्रामपंचायतींच्या सरपंच आरक्षणाबाबत कार्यपध्दती नमूद केली आहे.

xi) वरील सर्व बाबी लक्षात घेऊन, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम ( सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ ) मधील कलम १० अ पोटकलम (४) मधील अधिकारांचा वापर करुन, १८ जिल्हयातील ८२ तालुक्यांमधील ११६६ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम राबविण्यात यावा असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे. सदरच्या सार्वत्रिक निवडणूका **मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ व संलग्न याचिकांमध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन असतील.**

**आदेश**

१) **परिशिष्ट १** मध्ये दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार **परिशिष्ट २** मध्ये दर्शविलेल्या ८२ तालुक्यातील ११६६ ग्रामपंचायतींसाठी सदस्य पदासह थेट सरपंच पदाच्या सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम राबविण्यात यावा.

२) निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींमध्ये, निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यापासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता लागू राहील. या क्षेत्रातील मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणारी कोणतीही कृती/घोषणा मंत्री, खासदार, आमदार व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकाऱ्यांना आचारसंहिता कालावधीत कुठेही करता येणार नाही.

( आयोगाचे आचारसंहितेबाबतचे दि. १४/१०/२०१६ चे एकत्रित आदेश, दि.०६/०९/२०१७ चे अतिरिक्त आदेश व दिनांक १७/१२/२०२० चे पत्र )

३) **या निवडणुकांसाठी नामनिर्देशनाची प्रक्रिया संगणक प्रणालीव्दारे राबविण्यात यावी.**

४) सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४, दिनांक ०६ डिसेंबर, २०२१ अन्वये राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार सार्वत्रिक किंवा पोटनिवडणूक कार्यक्रमांकरिता नामनिर्देशनपत्र दाखल करण्याचा शेवटचा दिनांक हा ३१ डिसेंबर, २०२२ किंवा त्यापूर्वीचा असेल, त्याबाबतीत नामनिर्देशनपत्रासोबत वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यपत्र किंवा पडताळणी समितीकडे अर्ज केला असल्याबाबतचा अन्य कोणताही पुरावा आणि निवडून आल्याच्या दिनांकापासून १२ महिन्यांच्या आत पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करील, असे हमीपत्र सादर करण्याची मूभा उमेदवारांना दिली आहे.

५) परिशिष्ट १ येथील निवडणुक कार्यक्रमानुसार मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अशी असेल. (मात्र नक्षलग्रस्त भागामध्ये उदा. गडचिरोली, गोंदीया करीता सकाळी ७.३० ते दुपारी ३.०० वा. पर्यंत )

६) निवडणूक कार्यक्रम सुरु झाल्यानंतर एखादया ग्रामपंचायतींच्या निवडणूकी संदर्भात मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास, जिल्हाधिकारी यांना त्यांच्या स्तरावर स्थगितीची कार्यवाही करुन आयोगाला त्वरीत कळविणे आवश्यक राहील.

७) ग्रामपंचायतींची निवडणूक प्रक्रिया अधिकाधिक पारदर्शी पध्दतीने पार पाडण्याच्या दृष्टीने आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या पूर्वतयारी आदेशातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

८) नवीनतम उपक्रम राबविण्यासंदर्भात वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

९) **केंद्र व राज्य शासनाकडून कोविड -१९ च्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना व दक्षता घेण्याबाबतच्या सूचना / निर्बंध लागू झाल्यास आयोगाचे दिनांक १७/०१/२०२२ च्या आदेशातील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.**

१०) सोबतच्या **परिशिष्ट १ नुसार निवडणूक कार्यक्रम** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार देण्यात येत आहे. तथापि निवडणूक कार्यक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर अतिवृष्टी, पूर इ. नैसर्गिक आपत्ती निवडणूक असलेल्या क्षेत्रात उद्भवल्यास त्याबाबतचा अहवाल तात्काळ आयोगास सादर करण्यात येईल, याची संबधित जिल्हाधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

११) राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक पुढील प्रमाणे -

| | |
|---|---|
| संकेत स्थळ | www.mahasec.maharashtra.gov.in |
| दूरध्वनी क्रमांक ( ग्रा.पं. शाखा) | ०२२-२२८४६७२० |
| दूरध्वनी क्रमांक (संगणकीकरण शाखा) | ०२२-२२८८६९५० |
| ई-मेल | sec.mh@gov.in |

सदरचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

**सोबत - परिशिष्ट - १ व परिशिष्ट २**

06/08/22

( किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:- १. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग/वित्त विभाग तसेच सर्व प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.

३.मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

४.पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

५. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
यांना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आवश्यक अनुदान संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मागणीचा विचार करुन त्यांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावे.

६. विभागीय आयुक्त (सर्व) यांना उचित कार्यवाहीसाठी

७. संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

८.संचालक, शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई ४०० ००४

यांना कळविण्यात येते की, निवडणुकांच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक साधनसामग्री पुरविण्यात यावी. तसेच मतपत्रिका व इतर छपाई विहित वेळेत पूर्ण करुन देण्याची कृपया व्यवस्था करावी.

९. पोलिस महानिरीक्षक ( सर्व संबंधित), महाराष्ट्र राज्य

१०. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

१२. जिल्हा पोलिस अधिक्षक ( सर्व संबंधित)

१३. उपायुक्त, राज्य निवडणूक आयोग यांना मतदान साहित्याच्या उपलब्धतेसंदर्भात पुढील उचित कार्यवाहीसाठी.

१४. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग

१५. राज्य निवडणूक आयोगातील निवडणूक कार्यासने.

१६. निवड नस्ती.

## परिशिष्ट १

(क्रमांक-रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.०४/का.०८, दिनांक ०७/०९/२०२२ च्या आदेशासोबतचे सहपत्र)

**माहे जानेवारी २०२१ - मे २०२२ या कालावधीत मुदत संपलेल्या व जून २०२२ ते सप्टेंबर २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी (सदस्य पदासह थेट सरपंच) संगणकप्रणालीव्दारे राबविण्याचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम..**

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | तहसिलदार यांनी निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १३/०९/२०२२ (मंगळवार) |
| २ | नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ ( नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी ) | दिनांक २१/०९/२०२२ (बुधवार) ते दिनांक २७/०९/२०२२ (मंगळवार) वेळ स.११.०० ते दु.३.०० (दिनांक २४/०९/२०२२ चा शनिवार व दिनांक २५/०९/२०२२ चा रविवार वगळून) |
| ३ | नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी ) | दिनांक २८/०९/२०२२ (बुधवार ) वेळ सकाळी ११.०० वा.पासून छाननी संपेपर्यंत |
| ४ | नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी ) | दिनांक ३०/०९/२०२२ (शुक्रवार ) दुपारी ३.०० वा. पर्यंत |
| ५ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक ३०/०९/२०२२ ( शुक्रवार ) दुपारी ३.०० वा. नंतर |
| ६ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दिनांक १३/१०/२०२२ (गुरुवार) सकाळी ७.३० वा. पासून ते सायं. ५.३० वा. पर्यंत (नक्षलग्रस्तभागासाठी सकाळी ७.३० वा. पासून ते दु. ३.०० वा. पर्यंत) |
| ७ | मतमोजणी व निकाल घोषित करण्याचा दिनांक (मतमोजणीचे ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील) | दिनांक १४/१०/२०२२ (शुक्रवार) |
| ८ | जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणुकीच्या निकालाची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक १९/१०/२०२२ (बुधवार) पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

( क्रमांक - रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.०४/का.०८, दिनांक ०७/०९/२०२२ च्या आदेशासोबतचे सहपत्र )

परिशिष्ट ब

| अ.क्र. | जिल्हा | तालुक्याचे नाव | ग्रामपंचायतींची संख्या |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | कल्याण | ७ |
| २ | ठाणे | अंबरनाथ | १ |
| ३ | ठाणे | ठाणे | ५ |
| ४ | ठाणे | भिवंडी | ३१ |
| ५ | ठाणे | मुरबाड | ३५ |
| ६ | ठाणे | शहापूर | ७९ |
| ७ | पालघर | डहाणू | ६२ |
| ८ | पालघर | विक्रमगड | ३६ |
| ९ | पालघर | जव्हार | ४७ |
| १० | पालघर | वसई | ११ |
| ११ | पालघर | मोखाडा | २२ |
| १२ | पालघर | पालघर | ८३ |
| १३ | पालघर | तलासरी | ११ |
| १४ | पालघर | वाडा | ७० |
| १५ | रायगड | अलिबाग | ३ |
| १६ | रायगड | कर्जत | २ |
| १७ | रायगड | खालापूर | ४ |
| १८ | रायगड | पनवेल | १ |
| १९ | रायगड | पेण | १ |
| २० | रायगड | पोलादपूर | ४ |
| २१ | रायगड | महाड | १ |
| २२ | रायगड | माणगांव | ३ |
| २३ | रायगड | श्रीवर्धन | १ |
| २४ | रत्नागिरी | मंडणगड | २ |
| २५ | रत्नागिरी | दापोली | ४ |
| २६ | रत्नागिरी | खेड | ७ |
| २७ | रत्नागिरी | चिपळूण | १ |
| २८ | रत्नागिरी | गुहागर | ५ |
| २९ | रत्नागिरी | संगमश्वर | ३ |
| ३० | रत्नागिरी | रत्नागिरी | ४ |
| ३१ | रत्नागिरी | लांजा | १५ |
| ३२ | रत्नागिरी | राजापूर | १० |
| ३३ | सिंधुदुर्ग | दोडामार्ग | २ |
| ३४ | सिंधुदुर्ग | देवगड | २ |
| ३५ | नाशिक | इगतपुरी | ५ |
| ३६ | नाशिक | सुरगाणा | ६१ |
| ३७ | नाशिक | त्र्यंबकेश्वर | ५७ |
| ३८ | नाशिक | पेठ | ७१ |
| ३९ | नंदुरबार | अक्कलकुवा | ४५ |
| ४० | नंदुरबार | अक्राणी | २५ |
| ४१ | नंदुरबार | तळोदा | ५५ |
| ४२ | नंदुरबार | नवापूर | ८१ |
| ४३ | पुणे | मुळशी | १ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४४ | पुणे | मावळ | १ |
| ४५ | सातारा | जावली | ५ |
| ४६ | सातारा | पाटण | ५ |
| ४७ | सातारा | महाबळेश्वर | ६ |
| ४८ | कोल्हापूर | भुदरगड | १ |
| ४९ | कोल्हापूर | राधानगरी | १ |
| ५० | कोल्हापूर | आजरा | १ |
| ५१ | कोल्हापूर | चंदगड | १ |
| ५२ | अमरावती | चिखलदरा | १ |
| ५३ | वाशिम | वाशिम | १ |
| ५४ | नागपूर | रामटेक | ३ |
| ५५ | नागपूर | भिवापूर | ६ |
| ५६ | नागपूर | कुही | ८ |
| ५७ | वर्धा | वर्धा | २ |
| ५८ | वर्धा | आर्वी | ७ |
| ५९ | चंद्रपूर | भद्रावती | २ |
| ६० | चंद्रपूर | चिमूर | ४ |
| ६१ | चंद्रपूर | मूल | ३ |
| ६२ | चंद्रपूर | जिवती | २९ |
| ६३ | चंद्रपूर | कोरपना | २५ |
| ६४ | चंद्रपूर | राजूरा | ३० |
| ६५ | चंद्रपूर | ब्रम्हपूरी | १ |
| ६६ | भंडारा | तुमसर | १ |
| ६७ | भंडारा | भंडारा | १६ |
| ६८ | भंडारा | पवनी | २ |
| ६९ | भंडारा | साकोली | १ |
| ७० | गोंदीया | देवरी | १ |
| ७१ | गोंदीया | गोरेगाव | १ |
| ७२ | गोंदीया | गोंदीया | १ |
| ७३ | गोंदीया | सडक/अर्जुनी | १ |
| ७४ | गोंदीया | अर्जुनी/मोर | २ |
| ७५ | गडचिरोली | चामोर्शी | २ |
| ७६ | गडचिरोली | अहेरी | २ |
| ७७ | गडचिरोली | धानोरा | ६ |
| ७८ | गडचिरोली | भामरागड | ४ |
| ७९ | गडचिरोली | देसाईगंज | २ |
| ८० | गडचिरोली | आरमोरी | २ |
| ८१ | गडचिरोली | एटापल्ली | २ |
| ८२ | गडचिरोली | गडचिरोली | १ |
| **एकूण** | | | **११६६** |